# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

## मंडळाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीमार्फत उपकर जमा करण्याची कार्यपध्दती

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३ (१) अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

या अनुषंगाने शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक बीसीए २००७/ प्र. क्र. ७८८/ कामगार ७-अ, दिनांक २६.१०.२००९, शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१० व शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक २१.०७.२०११ अन्वये इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ अंतर्गत शासकीय कामावरील उपकर वसूल करावयाची कार्यपध्दती निश्चित करणेत आली आहे.

विविध आस्थापनांकडून उपकराची रक्कम जमा करणे व त्यातून इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना / आर्थिक सहाय्य योजनांची अंमलबजावणी या मंडळाकडून करण्यात येते.

शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१० मधील परिच्छेद १ येथे व त्यासोबतच्या परिशिष्ट-१- मार्गदर्शक तत्वे यामधील परिच्छेद ४ आणि शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक २१.०७.२०११ मधील परिच्छेद अ) १ व ब)२ यामध्ये नमूद केल्याप्रमाणे उपकराची वसुल केलेली रक्कमेचा भरणा मंडळाच्या बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा मधील चालू खाते क्र. ००४२२०११००००१५३ मध्ये तसेच शासन परिपत्रक क्रमांक इमारत २०१३ / प्र. क्र. १७९ / कामगार-७-अ, दिनांक ४ मार्च २०१४अन्वये युनियन बँक ऑफ इंडिया, आंबेडकर रोड शाखा,बांद्रा (प.) या बँकेच्या बचत खाते क्र. ४४४३०२०१०१०४९२० मध्ये करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. उपकराचा भरणा करण्याचा चलनाचा नमुना शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१० अन्वये विहित करण्यात आला होता.

मंडळाच्या बँक खात्यांमध्ये उपकर भरणा-या आस्थापनांचा तपशील बँक खाते विवरणपत्रात तसेच प्रकल्प/योजना तपशील, बांधकामाचा एकूण खर्च, देय व भरणा केलेली उपकर रक्कम, चलन प्रती मंडळ कार्यालयास प्राप्त होण्यासाठी मंडळाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेकडून संगणकीय प्रणाली विकसित करून घेतली असून **सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या बी. के. सी., बांद्रे (पूर्व), मुंबई** शाखेत उपकर जमा करण्यासाठी मंडळाचे **चालू खाते क्रमांक ३६७११७८५९१** उघडण्यात आले आहे. मंडळाचे बँक खात्यामधील बदल, चलन नमुना, कार्यपध्दती पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आली आहे.

१. मंडळाचे बँक ऑफ इंडिया, ताडदेव शाखा मधील चालू खाते क्र.००४२२०११०००१५३ तसेच युनियन बँक ऑफ इंडिया, आंबेडकर रोड शाखा,बांद्रा (प.) या बँकेमधील बचत खाते क्र. ४४४३०२०१०१०४९२० हे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे या बँक खात्यांमध्ये उपकराची रक्कम जमा करण्यात येऊ नये.

२. उपकराची रक्कम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सुधारित चलनाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बी के सी शाखा, वांद्रे (पूर्व), मुंबई मधील मंडळाच्या **चालू बँक खाते क्रमांक ३६७११७८५९१** मध्ये **"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई" (Maharashtra Building and other Construction Workers Welfare Board, Mumbai)** यांचे नांवे धनाकर्षाने/RTGS/NEFT ने बँकेत जमा करण्यात यावा. उपकराच्या रक्कमा धनादेशाने स्विकारल्या जाणार नाहीत. मंडळाचे उपकर जमा करण्याच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधील बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | बँकेचे नांव | सेंट्रल बँक ऑफ इंडिया. |
| २ | बँकेची शाखा व पत्ता | बी.के.सी. शाखा, प्लॉट क्रमांक सी-६, बी ब्लॉक, बांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१. |
| ३ | खाते प्रकार | चालू खाते.(Current Account) |
| ४ | खाते क्रमांक | 3671178591 |
| ५ | आय.एफ.सी. कोड (IFSC) | CBIN0282611 |
| ६ | एम.आय.सी.आर.कोड (MICR) | 400016073 |
| ७ | बँक शाखा ई मेल | bmmumn2611@centralbank.co.in |
| ८ | बँक शाखा दुरध्वनी | 022-26590966 |

३. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध शाखांचे पत्ते, आय.एफ.सी. कोड, इ. तपशील तसेच उपकराचा भरणा बँक खात्यात जमा करण्यासाठीचा चलन नमुना सुधारित करण्यात आला असून तो मंडळाच्या वेबसाईट https://mahabocw.in/ वर उपलब्ध आहे.

४. उपकर संकलकांकडून व उपकर भरणा-या व्यकती/संस्था/आस्थापना यांनी उपकरांचा भरणा सुधारित चलनाद्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडियात करावयाचा आहे. या चलनात उपकर संकलकाचा, ज्यांच्याकडून उपकराची रक्कम जमा करण्यात आली आहे त्यांचा व त्यांना मंजूर करण्यात यावयाच्या/ आलेल्या प्रकल्पांचा/योजनांचा किंवा आणि प्रदान केलेल्या देयकांचा तपशील उपकर रक्कमेच्या धनाकर्षासह बँकेत सादर करावयाचा आहे.

५. एकापेक्षा अधिक उपकर वसुलीची रक्कम एकाच चलन व एकाच ध्नाकर्षाने बँकेत भरतांना उपकर वसुलीचा संपूर्ण तपशील (उपकर संकलकाचा व प्रकल्पाचा नांव/पत्ता, इ. याचा संपूर्ण तपशील, खर्चाची अंदाजित रक्कम/ देयकाची रक्कम, वसुल उपकर) स्वतंत्र विवरणपत्रात देऊन ते चलनासोबत जोडण्यात यावे.

६. चलनामधील तपशीलाची नोंद बँकेतील संगणक प्रणालीत नोंद घेतली जाणार आहे. प्राप्त होणा-या उपकर रक्कमेची पोहोच बँकेकडून (acknowledgement) दिली जाणार आहे.

७. उपकर जमा रक्कमेचा तपशील बँकेच्या संगणक प्रणालीत नोंदविला जाऊन त्याचा तपशील MIS अन्वये मंडळास प्राप्त होणार आहे.

वरीलप्रमाणे सर्व शासकीय व इतर बांधकाम करणा-या आस्थापना यांनी **१%** उपकराची रक्कम वसुल/वजावट करून मंडळाच्या **सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या चालू खाते क्रमांक ३६७११७८५९१** मध्ये जमा करावी. शासन निर्णय क्रमांक बीसीए २००९/ प्र. क्र. १०८/ कामगार ७-अ, दिनांक १७.०६.२०१० सोबत जोडण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.